पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

# प्रेसनोट क्र.५१ दिनांक ०८/०९/२०२२

# तलासरी पोलीस ठाणे यांचेकडून अंमली पदार्थांची विक्री करणा-या आरोपीतांवर कारवाई

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांना कोफेक्स नावाचे प्रिक्रिप्शनविना औषध गुंगीकारक द्रव्य अंमली पदार्थाची अनधीकृतपणे बेकायदेशिररित्या विक्रीसाठी वाहतूक होणार असल्याची गुप्त बातमी मिळाली. नमुद बातमीच्या आधारे श्री. अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे यांना नाकाबंदी करुन कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

वरील आदेशांप्रमाणे पोनि/अजय वसावे व त्यांच्या स्टाफने मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील आर. टि. ओ. चेकपोस्ट दापचरी येथे नाकाबंदी सुरु करुन संशयीत वाहनांची तपासणी सुरु करण्यात आली. नाकाबंदी दरम्याण मारुती सुझुकी कंपनीची सिल्व्हर एर्टीगा कार क्र एम.एच/४८/बी.एच/९६६८ यामध्ये १,४१,७५०/- रु.किमतीचे कोफेक्स प्रिक्रिप्शनविना औषधी गुंगीकारक द्रव अंमली पदार्थाच्या एकुण १०५० प्लास्टीक बाटल्या त्यावर इंग्रजीत meditex life sciences pvt ltd- cofex cough syrup chlor oheni ramien maieat phosphate syrup 100 ml असे लिहलेले वर्णनाचे त्याची प्रत्येकी किंमत १३५ रुपये अशा वर्णनाचा मुद्देमाल मिळून आला.

सदरबाबत तलासरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ।। ३१९/२०२२ एन.डी.पि.एस. ॲक्ट कलम ८ (ब), २२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून एकूण ०४ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा सपोनि/अमोल गवळी, नेमणूक तलासरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, अतिरीक्त कार्यभार डहाणु विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे, सपोनि/अमोल गवळी, सपोनि/भरत पाटील, पोउपनि/उमेश रोठे, पोउपनि/अनंत धांगडा व तलासरी पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली.